मुंबई लक्षदीप ८

मुंबई, शनिवार, दि.२१ जानेवारी २०१२

# रायगड किल्ल्यावरील प्लॅस्टिक कचऱ्याच्या समस्येवर रायगड ' रोप वे' ची नामी शक्कल





**महाड, दि. २० :** ऐतिहासिक किल्ले रायगडावर येणाऱ्या पर्यटकांकडुन होणाऱ्या प्लॅस्टिक कचऱ्याची समस्या दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. या प्लॅस्टिक समस्येवर रायगड रोप वे ने नामी शक्कल लढवून गेली दोन दिवसात पाच हजाराच्या वर प्लॅस्टिक बाटल्या जमा केल्या आहेत. त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक होत असून प्रशासनाने या कचऱ्याच्या समस्येवर मार्ग काढावा आणि शिवभक्तांनी गडाचे जतन करण्यासाठी स्वच्छता ठेवावी असे भावनिक आवाहन रोपवेचे कर्नल व्ही. के.एस.बेडेकर यांनी केले.

छ. शिवरायांनी आपली राजधानी याच गडावर केली, याच रायगडावर छ. शिवरायांचा राज्याभिषेक झाला, छ. शिवरायांची समाधी याच किल्ले रायगडावर आहे. ४०० वर्षांपूर्वीची शिवकालीन वैभवशाली इतिहासाची साक्ष येथील वास्तू देत आहेत. शिवप्रेमी आणि पर्यटक किल्ले रायगडावर येऊन छ. शिवरायांच्या अमरस्मृतींना अभिवादन करतात याच वेळी ते त्यांच्यासोबत आणलेल्या प्लॅस्टिक वस्तुंचा कचरा किल्ले रायगडच्या कानाकोपऱ्यात टाकून रायगड विद्रुपीकरण देखील करीत असतात. पिण्याच्या पाण्याच्या प्लॅस्टिकच्या बाटल्या, बिस्कीट, चॉकलेट, वेफरसारख्या खाद्यपदार्थांवरील प्लॅस्टिक वेष्टन हा या कचऱ्याचा प्रमुख भाग असुन किल्ले रायगडावरील परिसरात हा कचरा प्रामुख्याने दिसून येऊन किल्ले रायगडचे ऐतिहासीक वैभव विद्रुप करत होता. गेल्या काही दिवसांपासून प्लॅस्टिक कचऱ्याचा प्रश्न वारंवार चर्चेत येत होता. यावर उपाय योजनांच्या नावाने केंद्रीय पुरातत्व विभागाने येथील स्थानिक विक्रेत्यांच्या व्यवसायावर टाच आणली होती. खात्यामार्फत नोटिसा, पोलीस स्थानकात तक्रार, शासकीय अधिकाऱ्यांसमोर बैठका अशा अनेक प्रकारे पुरातत्व विभाग येथील स्थानिक व्यवसायिकांना वेढीस धरीत होता. मात्र या प्रकरणात कोणतीही ठोस उपाययोजना पुरातत्व विभागाने केली नाही.

काही दिवसांपूर्वी किल्ले रायगडावर महाडचे प्रांताधिकारी रवींद्र हजारे यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक घेण्यात आली. या बैठकीत रायगडवरील कचरा हाच प्रमुख विषय घेण्यात आला. या बैठकीत कोणताच ठोस निर्णय न झाल्याने रायगड रोप वे चे व्यवस्थापक आर. के. कुलकर्णी आणि राजेंद्र खातू यांनी आपल्या कल्पनेतून या कचऱ्याच्या प्रश्नावर मात करण्याचा निर्णय घेतला. रोप वे व्यवस्थापनाशी चर्चा करून त्यांनी हा निर्णय गुरुवारी अंमलात आणला आणि या निर्णयाचे त्यांना यशस्वी फलीत मिळाले असून पर्यटक शिवप्रेमी व स्थानिक नागरिकांनी एका दिवसात सुमारे पाच हजार प्लॅस्टिक बाटल्यांचा कचरा रोप वे स्टेशनला जमा केला.

कचऱ्याच्या समस्येवर मात करण्यासाठी रायगड रोप वे ने त्यांच्याकडून विकली गेलेली बाटली टाकण्याऐवजी पुन्हा परत केल्यास ४ रुपये तर इतर कोणतीही बाटली आणून दिल्यास २रुपये देण्याची योजनाच जाहीर केली आणि हा हा म्हणता या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. 'निसर्गावर प्रेम करा' असे या योजनेला नाव दिले असुन या नावाने हा सप्ताह साजरा केला जाणार आहे. हा सप्ताह साजरा करत असताना बिस्किट, वेफर्ससारखे पदार्थ प्लॅस्टिक वेष्टनासह न देता ग्राहकाकडून वेस्टन परत घेऊन ते पदार्थ कागदी पिशवीत दिले जात आहेत. अशा प्रकारे नावीन्यपूर्ण कल्पना राबवून रोप वे प्रशासनाने रायगडवरील प्लॅस्टिक कचऱ्यावर मात करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. पुढे जाऊन पर्यटक शिवप्रेमींनी गडाचे जतन आणि पावित्र्य राखण्यासाठी स्वच्छता ठेवावी व प्लॅस्टिक कचरा टाकू नये असे आवाहनही रोपवे प्रशासनाने केले.